पशुधन पर्यवेक्षक गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या सर्वसाधारण
बदल्या व नेमणूका करणेबाबत.
विनंती बदली २०२५

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**पशुसंवर्धन विभाग**

**जिल्हा परिषद आदेश क्रं.आस्था-१/कार्या-१/४१२/२०२५**
**अहिल्यानगर दिनांक :-१६/०५/२०२५**

वाचा- १.महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं.जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था-१४ दि.१५/०५/२०१४
२.महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन शुध्दीपत्रकक्रं.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-.१४ / दि.०२/०७/२०१
३.महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं.जिपब-८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४,दि.०७/०३/२०१९
४.मा.अवर सचिव ,महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग क्रं.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२२६/आस्था-१४,दि.११मे, २०२२
५.सर्वसाधारण बदल्याचे मंजूर इतिवृत्त दिनांक १५/०५/२०२५

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार , संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक शासन निर्णयातील तरतूदीनुसार, तसेच संदर्भ क्रं.४ च्या शासन पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या पशुधन पर्यवेक्षक गट-क या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्रमांक ३ येथून रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी **विनंती** बदलीने पदस्थापना देण्योत येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | बदलीने द्यावयाचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.संतोष नागनाथ पवार | पशुधन पर्यवेक्षक | पवैद कुळधरण ता.कर्जत | पवैद जवळा ता.जामखेड. | विनंती बदली. |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्रं.१ मधील प्रकरण -१ मुददा क्रं. ७ नुसार बदली होण्यापूर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२५ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत. अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा ,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.सदर बदली विनंती कारणास्तव झाली असल्याने **संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.**

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202505161100040 असा आहे.

**( आशिष येरेकर भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

श्री.संतोष नागनाथ पवार, पशुधन पर्यवेक्षक
पशुवैदयकीय दवाखाना कुळधरण पंचायत समिती कर्जत
द्वारा:- गटविकास अधिकारी पंचायत समिती कर्जत

२/-उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दि.०१/०६/२०२५ नंतर अदा करु नये,तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती जामखेड
प्रत:-पशुधन विकास अधिकारी (विस्तार)पंचायत समिती जामखेड / कर्जत.
प्रत:-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत:-निवड नस्ती

**( आशिष येरेकर भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**